महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================

जावक क्रमांक – ८०३ /७९ दिनांक :- १३ जून, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# 'म्हाडा' कोकण मंडळातर्फे १८ जून रोजी तिसऱ्या जनता दरबार दिनाचे आयोजन

मुंबई, दि. १३ जून, २०२५ :- नागरिकांच्या तक्रारींची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून म्हाडा मुख्यालयात राबविण्यात येणाऱ्या लोकशाही दिनाप्रमाणे म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ स्तरावर तिसऱ्या जनता दरबार दिनाचे बुधवार, दि. १८ जून, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार 'नागरिकांच्या तक्रारींचे निवारण' या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनता दिन आयोजित करावा, असे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले होते. या निर्देशानुसार व त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ स्तरावर तिसरा जनता दरबार दिन घेण्यात येत आहे.

कोंकण मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांच्या अध्यक्षतेखाली वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील भारतरत्न गुलजारीलाल नंदा सभागृहात जनता दरबार दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. जनता दिन उपक्रमात अधिकाधिक नागरिकांनी सहभाग घेऊन आपल्या तक्रारींबाबत लेखी निवेदन, अर्ज मंडळाकडे दिनांक १८ जून, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावे, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

D:\Documents\Press Release\79-2025 KB 3rd Janta Darbar Din Announced.docx

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================

Outward No. : 803/79 Dt. June 13, 2025

**Press Release**

# Konkan Board to organize second Janata Darbar on June 18 for public grievance redressal

Mumbai, June 13, 2025: The Konkan Housing and Area Development Board will organise the Third Janata Darbar on Wednesday, June 13, 2025, at 11:00 AM at the Bharat Ratna Gulzarilal Nanda Hall, 3rd Floor, MHADA Headquarters, Bandra (East).

Action Plan approved by the Hon'ble Chief Minister Shri Devendra Fadnavis and the Hon'ble Deputy Chief Minister and Housing Minister Shri Eknath Shinde. In accordance with the plan, which includes grievance redressal as a key component, Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer of MHADA, directed all regional boards to organise public hearings to resolve citizen complaints through Janata Darbar sessions. The upcoming session is being conducted as per those instructions.

The proceedings will be chaired by Mrs. Revati Gaikar, Chief Officer, Konkan Board. Citizens have been requested to participate in the Janata Darbar and submit their written applications or grievances to the Board by 11:00 a.m. on June 13, 2025.

###

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer, MHADA

---